संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

क्र.संगाबाअवि-३/संपमूमं./ १४२ /२०२६
दिनांक : ०८/०४/२०२६

प्रति,

प्राचार्य / विभागप्रमुख / मानद संचालक,
सर्व संलग्नीत संबंधीत महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा

विषय : उन्हाळी-२०२६ परीक्षांच्या पर्यायी परीक्षेकरीता पाठवावयाच्या माहितीबाबत....

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, जे विद्यार्थी क्रिडा / संस्कृतिक स्पर्धा / आव्हान / उत्कर्ष इत्यादीमध्ये सहभाग घेतात अश्या विद्यार्थ्यांचे पर्यायी परीक्षा घेण्याकरीता अर्ज योग्य मार्गाने उशिरा प्राप्त होतात, त्यामुळे परीक्षा घेतेवेळी वारंवार वेळापत्रकास दुरुस्त्या काढाव्या लागतात. तसेच काही विद्यार्थ्यांचे पर्यायी परीक्षेकरीता विहित नमुन्यातील अर्ज वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर किंवा पर्यायी परीक्षा सुरू असतांना सुध्दा प्राप्त होतात, त्यामुळे विद्यापीठाचे नियोजनात अडचण निर्माण होते.

उन्हाळी-२०२६ परीक्षेच्या दरम्यान जे विद्यार्थी क्रिडा / संस्कृतिक स्पर्धा / आव्हान / उत्कर्ष इत्यादीमध्ये स्पर्धामध्ये सहभाग घेणार आहेत, अश्या विद्यार्थ्यांचे पर्यायी परीक्षांचे अर्ज **योग्य मार्गे (संबंधीत प्राधिकरणाचे शिफारशीसह)** संबंधीत परीक्षेचा टप्पा सुरु होण्याच्या अगोदर परीक्षा विभागात प्राप्त होतील या बेताने पाठवावेत.

काही परिस्थितीत विद्यार्थ्यांची उपरोक्त स्पर्धाकरीता निवड ही त्याची परीक्षा सुरु झाल्यानंतर होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अश्या परिस्थितात संबंधीत विद्यार्थ्यांचे पर्यायी परीक्षेचे अर्ज योग्य मार्गाने सदर विद्यार्थांचे निवड पत्र प्राप्त झाल्यानंतर ५ दिवसात परीक्षा विभागात प्राप्त होतील या बेताने पाठवावेत, जेणेकरुन पर्यायी परीक्षेचे सुयोग्य नियोजन करणे विद्यापीठास शक्य होईल.

उपरोक्त बाबींची विद्यार्थ्यांना जाणीव करुन देवुन त्याप्रमाणे महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पर्यायी परीक्षेचे अर्ज विहीत प्रपत्रात आवश्यक कागदपत्रांसह पाठवुन विद्यापीठास सहकार्य करावे.

आपला,

(डॉ.नितीन अं. कोळी)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रतिलीपी :

१) मा.कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
२) मा.प्र-कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
३) संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
४) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
५) संचालक, विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
६) विभाग प्रमुख, गृहविज्ञान विभाग (अविष्कार), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती